FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर

0154222

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र ,जिल्हा मुंबई , पोलीस ठाणे ला.प्र.वि. मुंबई पहिली खबर क्र. 98 , वर्ष 2022 दिनांक 12/02/22
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार. प्रति. अधि 1988 , कलमे Sections 07
(ii) अधिनियम Act ..........., कलमे Sections ...........
(iii) इतर अधिनियम व कलने Other Acts and Sections ...........

3. (a) अपराधाची घटना : वार सोमवार , तारीख पासून 07/02/22 , वेळ ..........., तारीख पर्यंत 11/2/22 , वेळ ...........
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख 10/02/22 , वेळ ...........
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 02/22 , तारीख 12/2/22 , वेळ 07.05
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : ..........., लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ..........., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ...........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, एम टि एन एल बिल्डींग, 05 मजला एम. जी. रोड फोर्ट, मुंबई-400001 ठिकाणाचे नंबर ..........., गल्ली ..........., रस्त्याचे नाव ...........
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ..........., गाव ..........., पोस्ट ..........., तालुका ..........., जिल्हा ..........., राज्य ...........
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असलयास त्या पो.स्टे.चे नाव ..........., तालुका ..........., जिल्हा ..........., राज्य ...........
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव किरण अंकुश गर्जे (b) वडिलांचे / पतीचे नाव अंकुश गर्जे
Name Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय 29 वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. 8850239191
Date of Birth and Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ..........., दिल्याचा दिनांक ........... दिल्याचे ठिकाण ........... (f) व्यवसाय नोकरी
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदु , जात Caste ..........., जनजात Sub-Caste ...........
(h) पत्ता ए 1003 , गल्ली / सर्व्हे नं. ........ घर / नाव नं. ........... फोन / मो. नं. ........... पॅन नं. ........... वोटर्स नं. ...........
Address : Ward House/Name No. Phone/Mo. No. PAN No. Card No.
रस्त्याचे नाव जलाराम लॅन्डमार्क , जवळचे प्रसिद्ध ठिकाण ची. पन्च पत्र लिमीटेड प्लॉट न 060 सेक्टर न 11, कामोठे , गाव ..........., पोस्ट ..........., पो. स्टे. ...........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका पनवेल , जिल्हा रायगड राज्य महाराष्ट्र सध्याचा पत्ता ...........
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)
बलराम राजेंद्रप्रसाद सिंह वय 28 वर्षे. धंदा - नोकरी (लिपिक टंकलेखक) परिवहन आयुक्त कार्यालय महाराष्ट्र राज्य, MTNL, बि.नं 02, 05 वा माळा, एम.जी. रोड फोर्ट रा. डि युनिट नं 20, बद्री किराणा स्टोअर जवळ, आरे मिल्क कॉलनी गोरेगांव मुं - 400065

फिर्यादी श्री. किरण अंकुश गर्जे वय ३१ वर्षे, धंदा नोकरी रा. ठि. क्र. १०००२ जलाराम लॅण्डमार्क प्रीमियम प्लस लिमिटेड, प्लॉट नं ०७, सेक्टर नं ११, कामोठे पनवेल, जि. रायगड. मो. क्र. 8850239191 यांचा सविस्तर जबाब हा स्वतंत्र पानावर शांगणिकृत करण्यात आला असून तीच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून समजण्यात येत आहे.

समक्ष

(हणमंत सोमा क्षिरसागर)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

<u>फिर्याद</u> दिनांक :– १२/०३/२०२२

श्री. किरण अंकुश गर्जे, वय २२वर्षे, धंदा– नोकरी (सुपरवायझर, जय भगवान रोड कॅरिअर ट्रान्सपोर्ट) रा.ठि. ए–१००३, जलाराम लॅन्डमार्क सी.एच.एस. लि., प्लॉट नं. ६, सेक्टर ११, कामोठे, पनवेल, जि रायगड, मो.क्र. ८८५०२३९१९१

मी वरीलप्रमाणे असून उपरोक्त नमुद पत्यावर माझे कुटुंबासह मागील एक वर्षापासून वास्तव्यास असून मी करीत असलेल्या नोकरीतून मिळणाऱ्या वेतनावर उदर निर्वाह करतो. मी श्री. ईश्वर कुत्तरवाडे, यांचे जय भगवान रोड कॅरिअर ट्रान्सपोर्ट, पत्ता– बी विंग, रुम नं ४०३४, बिमा कॉम्पलेक्स, स्टील मार्केट, कळंबोली, पनवेल, जिल्हा–रायगड मध्ये मागील दोन वर्षापासून सुपरवायझर या पदावर काम करतो. मी काम करत असलेल्या कॅरिअर ट्रान्सपोर्ट कंपनीचे एकूण ०७ ट्रेलर वाहने आहेत. सदर ट्रेलरवरुन परराज्यातून ओव्हर सायझिंग मशिनरी/मालाची (लांबी–रूंदी जास्त असलेला) मुंबई पोर्ट येथे ने–आण करण्यात येत असतो. सदर ओव्हर सायझिंग मशिनरी/मालाची ने – आण करणेकरीता परिवहन आयुक्त कार्यालय, फोर्ट, मुंबई यांची ओ.डी.सी. परवानगी घ्यावी लागते. सदर परवानगी अर्ज केल्यानंतर २४ तासांच्या आत देणे बंधनकारक आहे. तसेच परवानगी घेतेवेळी प्रति ट्रेलर रु.२,०००/– इतकी शासकीय फी आकारण्यात येत असते. सदर फी भरणा केल्यानंतर सदरबाबत शासकीय पावती देण्यात येते.

दिनांक ०७/०३/२०२२ रोजी आमचे कंपनीचे ट्रेलर क्रमांक MH-46-BU-0082 व इतर तीन अशा एकूण ४ ट्रेलर मधून जास्त लांबी, रुंदीचा माल रामागुंडन (तेलंगाना) ते मुंबई पोर्ट येथे आणण्याकरीता परवानगी घेणेसाठी करीता मी परिवहन आयुक्त कार्यालय, एमटीएनएल बिल्डिंग, ५ वा मजला, फाऊंटन – २, एम.जी.रोड, फोर्ट, मुंबई यांचे कार्यालयात अर्ज केला होता. मी केलेल्या अर्जाचे अनुषंगाने वाहतुक करणाऱ्या गाडयांना २४ तासांचे आत वाहतूक परवाना देणे बंधनकारक असताना सदर परवानासंबंधाने कामकाज पाहणारे लिपीक श्री. बलराम सिंह हे शासकीय फी रु. २०००/– व्यतिरिक्त प्रत्येक गाडीमागे रु. १०,०००/– याप्रमाणे चार गाडयांचे एकूण रु.४०,०००/– मागणी करत होते. मी २ गाडयांचें शासकीय परवाना फी प्रत्येकी रु. २,०००/– प्रमाणे एकूण रु.४,०००/– भरणा दिनांक ०८/०३/२०२२ रोजी केलेले आहेत.

परंतु संबधित लिपिक श्री. बलराम सिंह यांनी मागणी केलेप्रमाणे प्रत्येक ट्रेलर मागे रु. १०,०००/– याप्रमाणे एकूण रु. ४०,०००/– रक्कम त्यांना देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दिनांक १०/०३/२०२२ रोजी सबंधित लिपिक सिंह यांच्या विरुध्द तक्रार देणेकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे आलो. मला ला.प्र.वि कार्यालयातील वरिष्ठांसमक्ष उभे करण्यात आले व माझ्या तक्रारीवर कारवाई करण्याकरीता पोलीस निरीक्षक श्री. क्षिरसागर साहेब यांची नेमणूक करण्यात आली. पोलीस निरीक्षक क्षिरसागर साहेब यांनी माझेकडे माझे तक्रारीबाबत सविस्तर चौकशी करुन परिवहन आयुक्त कार्यालय येथील लिपिक श्री. बलराम सिंह यांचेविरुध्द असलेल्या तक्रारीबाबत लेखी अर्ज लिहून देण्यास सांगितल्याने. मी माझी तक्रार मराठी भाषेत लिहून दिला. तसेच लिपिक श्री. बलराम सिंह हे संबंधित कार्यालयातून निघून गेले असल्याची शक्यता असल्याचे मी पो.नि. क्षिरसागर साहेबांना सांगितले. तेव्हा पो.नि. क्षिरसागर साहेबांनी मला दिनांक ११/०३/२०२२ रोजी सकाळी १०:०० वाजता ला.प्र.वि., मुंबई विभाग, वरळी, मुंबई येथील कार्यालयात हजर राहण्यास सांगितले.

पो.नि. क्षिरसागर यांनी सांगितल्याप्रमाणे मी दिनांक ११/०३/२०२२ रोजी ला.प्र.वि., मुंबई विभाग, वरळी, मुंबई या कार्यालयात सकाळी १०:०० वाजता हजर झालो. पो.नि. क्षिरसागर यांचे कक्षात त्यांचेसोबत उपस्थित असलेले दोन शासकीय पंच, स.पो.आ. गणेश कुंभार साहेंब यांचेशी माझी ओळख करुन दिली. त्यानंतर पो.नि. क्षिरसागर यांनी उपस्थित पंचांना माझे तक्रारीबाबत थोडक्यात हकीकत समजावून सांगून मी दिनाक १०/०३/२०२२ रोजी दिलेला तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि. क्षिरसागर यांच्या सुचनेवरुन सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही शासकीय पंचांनी स्वाक्षरी करुन व त्यानंतर पो.नि. क्षिरसागर यांनी स्वत: स्वाक्षरी करुन तक्रार अर्ज स्वत:च्या ताब्यात ठेवला.

त्यानंतर पो.नि. क्षिरसागर साहेबांनी पडताळणीकरीता आवश्यक बाबींची पुर्तता करुन मी, स.पो.आ. गणेश कुंभार, पो.नि. क्षिरसागर, दोन शासकीय पंच व पोलीस पथक असे दोन शासकीय वाहनाने ला.प्र.वि. वरळी, मुंबई कार्यालयातून बाहेर पडून मुंबई उच्च न्यायालयाच्या गेट नं ०२ समोरील रस्तालगत थोडया

अंतरावर गाडया उभ्या केल्या. त्यानंतर स.पो.आ. कुंभार साहेब व पो.नि. क्षिरसागर साहेब यांनी मला व पंचांना पडताळणीबाबतच्या सुचना देवून लिपिक श्री. बलराम सिंह यांचे कार्यालयात पडताळणीकरीता डिजिटल रेकॉर्डर चालू करुन माझे शर्टाचे आतील बाजूस बनियानला लावून पंच श्री.किरण डब्बे यांचेसोबत जाण्यास सांगितल्याने मी व पंच पायी पायी परिवहन आयुक्त कार्यालय, एमटिएनएल बिल्डिंग, ५ वा मजला, एम.जी.रोड, फोर्ट, मुंबई या कार्यालयात जावून लिपिक श्री. सिंह यांची भेट घेतली. तेव्हा माझे सोबत असलेल्या पंचाबाबत श्री. सिंह यांनी माझेकडे विचारणा केली असता मी त्यांना हे मला खाली भेटले त्यांना देखिल ओ.डी.सी. परवानगी हवी आहे. श्री. सिंह यांनी पंचांकडे त्यांचे गाडीबाबत चौकशी करून कागदपत्र घेवून येण्यास सांगून त्यांना बाहेर जाण्यास सांगितले. त्यानंतर श्री. सिंह यांनी मला "माझ्या दोन ट्रेलच्या परवानगी झाल्या आहेत उर्वरीत दोन ट्रेलरची परवानगी बाकी आहे, तु पावती घेवून ये " असे सांगितल्याने मी उर्वरीत दोन ट्रेलरचे पैस भरून पुन्हा सिंग यांचेकडे आलो व परवानगी बाबत विचारले असता श्री. सिंह यांनी " **दोन मी आता तयार करतो, पावती फाडुन दे मला आणि तु खाली जा होईस्तव, खालुन तु अर्धा तासा मध्ये ये, मी अर्ध्या तासामध्ये तुडा रेडी करून ठेवतो, मी चारीही देवून टाकतो चाळीस तु पाकिटामध्ये घेवून ये, आणि हे चार तुला देवून टाकतो"**

त्यानंतर मी व पंच श्री. किरण डब्बे असे पोलीस वाहन उभे असलेल्या ठिकाणी आलो. तेथे आल्यानंतर पो.नि. क्षिरसागर व स.पो.आ. कुंभार यांनी श्री. सिंह व आमचेत झालेले संभाषण ऐकले व सापळा कारवाईच्या अनुषंगाने मला व पंच श्री.किरण डब्बे यांना आवश्यक त्या सुचना देवून माझेकडे मी सोबत आणलेल्या लाचेच्या रकमेबाबत चौकशी केली. तेव्हा मी माझेकडील एकुण रू. ४००००/– (त्यामध्ये रू. ५००/– दराच्या ४४ चलनी नोटा व रू. २०००/– दराच्या ९ नोटा) क्षिरसागर साहेबांकडे दिल्या. त्यानंतर मला व पंचाना ॲंथ्रासिन पावडर बाबत माहिती देवून सदर नोटांना ॲंथ्रासिन पाऊडर लावून सदरच्या नोटा एका केसरी रंगाच्या लिफाफ्यात घालून सदर लिफाफ्यास देखिल ॲंथ्रासिन पाऊडर लावून त्याबाबतचे गुणधर्म समजावून सांगून, सदर लिफाफा माझे नेसणीस असलेल्या पॅटच्या उजव्या खिशात ठेवण्यात आल व श्री. बलराम सिंह यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर डाव्या हातातील मनगटावरील घड्याळ काढून मनगटावर हात फिरवून इशारा करण्याबाबत सांगीतले. तसेच पोलीस पथक कोणासही संशय येणार नाही अशा रितीने आजूबाजूस थांबून इशारा मिळताच श्री. सिंग यांना ताब्यात घेतील असे सांगितले. त्यानंतर पो.नि. क्षिरसागर यांनी माझे शर्टाचे आतील बाजूस बनियानला डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर लावला. त्यानंतर मी व पंच श्री. डब्बे असे पुन्हा पायी पायी लोकसेवक श्री. बलराम सिंह यांचे कार्यालयात रवाना झालो.

मी व पंच श्री. डब्बे असे लिपिक श्री. बलराम सिंह यांच्या परिवहन आयुक्त, कार्यालया जवळ गेलो तेव्हा सिंह यांच्या आजुबाजुस थोडी गर्दी असल्याने मी सिंह यांच्यापासून थोडा लांब उभा राहिलो व पंच श्री. डब्बे हे सिंह यांच्या कार्यालयात जाऊन सिंह यांना दिसणार नाही अश्या रितीने उभे राहिले. थोडया वेळयाने लिपिक बलराम सिंह यांनी मला माझे सोबत आलेल्या पंचाबाबत विचारणा केली असता मी ते कार्यालयातच असल्याचे सांगितले. तेव्हा सिंह यांनी पंचांना त्यांच्या कामाबाबत विचारणा केली असता पंचाने त्यांचे काम दुसऱ्या एजंटला दिले असल्याचे पंचांना सांगितले. त्यानंतर श्री. सिंह मला घेवून बोलत बोलत कार्यालयाचे तिसऱ्या मजल्यावर घेवून गेले. तेथे त्यांनी मला " **दे चल निकालो और दो का भी लाता हू।** " असे बोलल्यावर मी त्यास "**सर चार गाडी का चाळीस हजार पुरा पॅक किया है।**" असे सांगून श्री. सिंह यांनी मागणी केल्याने माझ्या पॅन्टच्या उजव्या खिशात असलेल्या लिफाफ्यासह रक्कम मी माझ्या उजव्या हाताने काढून श्री. बलराम सिंह यांच्या उजव्या हातात दिली व त्यांनी त्यांच्या डाव्या हाताने २ ट्रेलरच्या परवानग्या माझ्या हातात दिल्या. त्यानंतर मी पोलीस पथकाकडे सिंग यांनी पैसे स्विकारले बाबत पुर्वनियोजित इशारा करताच पोलीसांनी श्री. सिंह यांना ताब्यात घेतले.

पोलीस पथक श्री. बलराम सिंह यांना घेवून त्यांचे ५व्या मजल्यावरील कार्यालयात गेले. तेथे श्री. बलराम सिंह यांनी माझेकडून स्विकारलेली लाचेची रक्कम त्यांचे उजव्या खिशातून खाकी लिफाप्यासह ताब्यात घेतली.

समक्ष;

(हणमंत क्षिरसागर)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

फिर्यादी श्री. किरण अंकुश गर्जे, वय २२वर्षे यांचा दि. ११/०३/२०२२ रोजीचा जबाब पुढे चालू....

दिनांक ०७/०३/२०२२ रोजी आमच्या ट्रान्सपोर्टच्या चार ट्रेलर गाडयांमधून जास्त लांबी रुंदीचा माल रामगुंडन (तेलंगाना) ते मुंबई पोर्ट येथे आणण्याकरीता परिवहन आयुक्त कार्यालय, फोर्ट, मुंबई येथे अर्ज केला होता. संबंधित परवाना देण्याचे काम पाहणारे लिपिक श्री. बलराम सिंह हे प्रत्येक ट्रेलरची शासकीय फी रु. २,०००/– असताना प्रत्येक ट्रेलरमागे शासकीय फी व्यतिरिक्त अधिकचे प्रत्येकी रु. १०,०००/– प्रमाणे एकूण रु. ४०,०००/– इतकी लाचेची मागणी केली व दिनांक ११/०३/२०२२ रोजी लोकसेवक श्री. बलराम सिंह यांनी माझेकडून लाचेची रक्कम स्विकारली म्हणून माझी त्यांचे विरूध्द फिर्याद आहे.

या पूर्वी मी लिपीक श्री. बलराम सिंग यांचेशी कोणतेही आर्थिक व्यवहार केलेले नाही.

माझा जबाब संगणकावर मराठीमध्ये टंकलिखीत केला असून तो मी वाचून पाहीला, तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

( हणमंत क्षिरसागर )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Kiran

...दाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..............................................

...Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

... चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........................................................................................................................

...0. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..............................................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

...1. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..............................................

Unnatural / Accidental Death Case No., if any

...2. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page

बाजूस नमूद वेळी, रोजी व ठिकाणी यातील फिर्यादी हे काम करित असलेल्या कंपनीचे ०४ ट्रेलर
...परदेशातून ओव्हरसाईझिंग मशिनरी/माल घेवून मुंबई पोर्ट येथे येणार होते. सदरच्या मशिनरी/
...माल ट्रेलरने रोडने घेवून जाण्यासाठी परिवहन आयुक्त कार्यालय यांची परवानगी घ्यावी लागत
...असल्याने प्रति ट्रेलर रु २००० इतकी शासकीय फीची फिर्यादी यांनी नमूद कार्यालयात
...भरणा केली होती. यातील आरोपी बलराम राजेंद्र प्रसाद सिंह यांनी शासकीय फी व्यतिरिक्त
...प्रति ट्रेलर रु १०,०००/- असे एकूण ४०,०००/- रुपये लाच म्हणून फिर्यादी यांच्याकडे मागणी केली होती व
...ती दिले तरच परवानगी मिळेल असे सांगितले होते दि ११/२/२२ रोजी केलेल्या पडताळणीत यातील लोकसेवकाने फि.
...यांच्याकडे परवानगी देण्याकरिता रु ४०,०००/- इतक्या लाचेची मागणी करून ती स्विकारताना लोनट रंगेहाथ पकडण्यात आले
म्हणून त्याचेविरुद्ध ला.प्र.अधि १९८८ कलम ०७ अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले

त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
पो.नि. हणमंत क्षिरसागर / ला.प्र.वि. मुंबई ............

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........................................................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......................., जिल्हा ..................., राज्य .................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................. Rank................ No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................... (3) Transferred to P. S. ..................................................

District.................................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

Grisant

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ...हणमंत क्षिरसागर...
पदनाम Rank ...पोलीस निरीक्षक...
तपासिक अं. चा कोड क्र. ...ला.प्र.वि. मुंबई...
Posting
Code No. of I. O. ..................................................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख...................
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**